# मंत्री पंकजाताई मुंडे यांची डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या निवासस्थानी भेट






बीड । दिव्य न्युज

राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी रविवारी (दि.२१) राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.

या भेटीदरम्यान क्षीरसागर कुटुंबीयांच्यावतीने पंकजाताई मुंडे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, माजी नगराध्यक्ष डॉ.दीपाताई क्षीरसागर, संपादक दिलीप खिस्ती, डॉ.सारिकाताई क्षीरसागर, भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संजय आंधळे, डीसीसी बँकेचे माजी अध्यक्ष आदित्य सारडा, चंपावती शिक्षण संस्थेचे चंद्रकांत मुळे, सलीम जहांगीर, भाजप अल्पसंख्याक नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दिकी, राष्ट्रवादी कॉंग्रेस विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे यांच्यासह भाजपसह राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होत.

---

अतिवृष्टी पाहणी नेकनूर चे उपसरपंच. सचिन शिंदे आज नेकनूर जि.प सर्कल मधील सफेपूर, तांदळवाडी, वैतागवाडी, अंधापुरी घाट. येथे अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे खूप मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. तहसीलदार ,ग्राम महसूल अधिकारी याना पंचनामे करून लवकरात लवकर मदत करण्यासंदर्भात सूचना केल्या यावेळी सोबत अंधापुरीचे सरपंच पप्पू जगताप, सफेपुरचे माजी सरपंच श्रीराम आप्पा घोडके , मराठा सेवक जगन्नाथ घोडके , व परिसरातील शेतकरी , नागरिक. उपस्थित होते



---



पिंपळा : नवरात्र हा पवित्र उत्सवाची सुरुवात झाली.दरवर्षी पिंपळा गावातील युवकवर्ग मोठ्या संख्येने श्री.क्षेत्र तुळजापूर या ठिकाणाहून दोन दिवसात पायी ज्योत घेऊन येतात.त्यानंतर गावामध्ये ज्योतीची प्रदक्षिणा मिरवणूक उत्साहात पार पडते.नंतर जगदंबा देवीच्या मंदिरासमोर आरती घेऊन कार्यक्रम संपन्न होतो.यावेळेस सर्व ग्रामस्थांच्या वतीने ज्योत घेऊन येणारे युवकांचे स्वागत केले जाते.

---

## बप्पा, आपण मुस्लिम समाजा सोबत मारल्या गप्पा- शेख युनूस

बीड । दिव्य न्युज

बीड जिल्ह्यातील ९९ टक्के मुस्लिम समाज आपल्या सोबत होता.पण तुम्ही त्यांना फक्त आश्वासनाच्या मारल्या गप्पा,पण आपल्याकडून समाजाची खूप आहे अपेक्षा ती आपण पूर्ण करावी.



शहरात दोन-तीन दिवसाच्या पावसामुळे हाहाकार माजून मोमीनपुरा, बालेपिर परिसरात गोरगरिबांच्या घरात पाणी शिरले होते. आणि आपण शहरात दोन दिवस असून सुद्धा त्या भागातील गोरगरीब जनतेला भेटायला सुद्धा गेला नाहीत. ही खूप मोठी खंत आहे. ज्या मुस्लिम समाजाच्या लोकांनी कामे धंदे सोडून आपल्यासाठी जीवाचे रान केले.त्या समाजाला आपण विसरण्याचे काम आपण करीत आहात.

साहेब नियमानुसार रेल्वे बोर्ड वर उर्दू भाषेत नाव लिहिणे बंधनकारक आहे. पण आपण जाणून बुजून याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे,असे जनतेकडून सांगण्यात येत आहे. तसेच मुस्लिम भागात रस्ते नाहीत,नाल्या नाहीत , खांबावर पथदिवे नाहीत, घंटागाडी येत नाही.आपण मुस्लिम लोकांना आश्वासन दिले होते, मी खासदार फंडातून मुस्लिम भागाचा विकास करेल, साहेब कुठे गेला विकास? आपण मुस्लिम समाजाकडे पाठ फिरवण्याचे काम करू नका, हीच मुस्लिम समाजाची इच्छा आहे.

---

## रफिद शकील सय्यद यांची रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) च्या मुस्लिम आघाडी प्रमुखपदी नियुक्ती



ओझर । दिव्य न्यूज :जुबेर शेख

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) तर्फे कार्यक्षेत्रात केलेल्या कामगिरीच्या आधारे रफिद शकील सय्यद यांची महानगर प्रमुख मुस्लिम आघाडी सेल (नाशिक शहर) म्हणून निवड करण्यात आली आहे.

ही नियुक्ती पत्र उत्तर महाराष्ट्र प्रदेश प्रमुख तथा नाशिक जिल्हा प्रमुख प्रकाशजी लोंढे (रिपाई-आठवले) यांच्या स्वाक्षरीने देण्यात आले आहे. या पत्रात नमूद करण्यात आले आहे की, पक्षाने सोपवलेल्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे व कर्तव्यनिष्ठेने पार पाडाव्यात तसेच पक्षाच्या धोरणांचा प्रसार जनतेपर्यंत पोहोचवावा.

रफिद शकील सय्यद यांच्या या नियुक्तीमुळे नाशिक शहरातील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) च्या कार्याला अधिक बळ मिळणार असून मुस्लिम समाजातील युवकांमध्ये नवा उत्साह निर्माण होणार आहे. या नियुक्तीबद्दल रफिद शकील सय्यद यांनी पक्ष नेतृत्वाचे आभार मानले असून, नाशिक शहरातील सर्व समाजघटकांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि पक्षाची विचारधारा लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी मी सदैव तत्पर राहीन, अशी प्रतिक्रिया दिली.

---

## पोस्टमन नामदेव गवळी यांच्या पाठपुराव्यामुळे अपघातात मृत पावलेल्या व्यक्तीच्या वारसांना मिळाले दहा लाख रुपये..!

### भारतीय डाक विभाग व टाटा एआयमुळे तळपे कुटुंबाला मिळाला आर्थिक हातभार

पुणे । दिव्य न्युज

कोरेगाव भीमा येथे इंडिया मेटल्स कंपनीमध्ये पोस्टमन नामदेव गवळी यांनी कंपनीच्या एच आर सौ.माधुरी सिनलकर राऊत यांच्या सहकार्याने पोस्टाच्या अपघाती विमा योजनेचा मेळावा घेतला होता. वार्षिक हप्ता केवळ ५२० रु. भरुन १० लाखांचा अपघाती विमा आणि इतर फायदे यामध्ये आहेत.कंपनीमधील सुमारे २०० कामगारांनी हा विमा काढला होता. सुमारे ७ महिन्यांपूर्वी दरम्यान येथील सुपरवायझर स्व.श्री.देवेंद्र तळपे यांचा अज्ञात वाहनाच्या धडकेत अपघाती मृत्यू झाला होता. त्यांनीही भारतीय डाक विभागाचा अपघाती विमा काढला होता. वाघोली येथील पोस्टमन नामदेव गवळी यांनी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करून पाठपुरावा केल्याने मयत तळपे यांच्या वारसांना दहा लाख रुपयांची रक्कम मिळाली आहे.




यासाठी नामदेव गवळी यांनी मयत तळपेंच्या वतीने वारंवार पाठपुरावा केला. पोस्टमन गवळी यांचे तळपे कुटुंबाने मनापासून आभार मानले आहेत.

भारतीय डाक विभागाची ५२० रुपयात दहा लाख रु.अपघात विम्याची योजना अत्यंत लाभदायक आहे. दरम्यान पोस्टमन नामदेव गवळी यांनी वरिष्ठ अधिकारी श्री.प्रमोद भोगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली वाघोली व परिसरात या अपघाती विम्याचे गावोगावी मेळावे घेतले होते. पोस्टाचा अपघाती विमा काढल्यामुळे मृत तळपेंच्या कुटुंबाला आवश्यक कागदपत्रांच्या पुर्ततेमुळे सुमारे दहा लाख रुपयांची विमा रक्कम मिळाली आहे. पोस्टाचा व टाटा एआयचा विमा काढल्यामुळे तळपे कुटुंबाला आर्थिक हातभार मिळाला आहे. मयत तळपे यांच्या पश्चात पत्नी, मुलगा व मुलगी असा परिवार आहे. तळपे यांचे अपघाती निधन झाल्याने त्यांचे कुटुंब खचून गेले होते. परंतु पोस्टमन गवळी यांनी तळपे कुटुंबाला मानसिक धीर देत विम्याची रक्कम मिळवून देण्यासाठी संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला.

माझ्या पतीचे अपघाती निधन झाल्याने मी खचून गेले होते. माझी एकट्याची विमा कंपनीशी लढण्याची ताकद नव्हती. परंतु पोस्टमन गवळी यांनी मानसिक आधार दिला. स्वतः क्लेम कंपनीशी वेळोवेळी भांडून त्यांनी अनेक अडचणी सोडविल्या. गवळी यांच्या पाठपुराव्यामुळे दहा लाख रुपयांची विमा रक्कम मिळाली आहे. रकमेचा उपयोग मुलांच्या शिक्षणासाठी करणार आहे. पैशांनी गेलेली व्यक्ती परत येत नाही, पण मुलांच्या भवितव्यासाठी याचा निश्चित उपयोग होणार आहे.

– श्रीमती तळपे

---

## शिक्षक नेते हाजी कादरी शाहीद सर यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित

पुणे । दिव्य न्युज

पुणे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना तर्फे हाजी कादरी शाहेद सर यांच्या कामाची दखल घेऊन यांना जीवन गौरव पुरस्काराने डा.बाबासाहेब आंबेडकर भवन पुणे येथे समानित करण्यात आला.या भाव्य पूरस्कार सोहळ्यात पूणेतील मान्यावर उपस्थित होते.कार्यक्रमाचे अध्यक्ष संघटनेचे राज्य सचिव श्री.हनुमंत चव्हाण सर होते.

क्रांतिकारी शिक्षक संघटननेचे नेते संस्थापक सचिव शाहीद कादरी सर यांनी गेल्या एक दशक पेक्षा अधिक काळ पासून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या विविधा मागणी आंदोलन, मोर्चा, उपोषण, धरणे आंदोलन तसेच सामाजिक जाणिव या माध्यमा तून आनाथ मुलाना मदत करणे,



दवाखानात आजारी व्यक्ती बाबत माहिती प्राप्त होतच रात्र असो दिवस त्यांना आर्थिक मदत करणे,जेवण देणे तसेच सर्व धार्मिक कार्यक्रमात सहभाग हे सर्व त्यांच्य जीवनाचे उद्देश झाला आहे. हे सर्व जबाबदारी पूर्ण करत असताना विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणुन वगळा ठसा हे तर त्यांना शिकवणीचे कौशल्य व त्यांच्या तील आपलेपण यातुन कमवले आहे. हे सर्व करत असताना परिवार, मित्र, समाज यांना ही सोबत घेऊन उत्कृष्ट माणूस होणे हे सर्वांना जमत नाही. जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित केल्याने मित्र पारिवार ,नातेवाईक व क्रांतिकारी शिक्षक संघटनेचे इतर पदाधिकारी मुस्तफा सर,वाघमारे सर,शफी सर,अय्युब सर,गायकवाड सर,असरार सर,पवार सर.युनूस सर,अजीज सर,ताजोद्दीन सर,मुबीन सर,राजू सर,सगीर सर,आदींनी शुभेच्व्हा दिले.

---

## सुरज मुळे एम.बी.बी.एस. शिक्षणासाठी ताजिकिस्तानला रवाना ; दौलावडगावचा अभिमान

दौलावडगाव । दिव्य न्युज

दौलावडगाव ता.आष्टी गावातील अतिशय गरीब कुटुंबातील मुलगा सुरज म्हतारदेव मुळे याने आपल्या जिद्द, मेहनत आणि अभ्यासाच्या जोरावर एम.बी.बी.एस. शिक्षणासाठी ताजिकिस्तानला रवाना होत गावाचे नाव उज्वल केले आहे. या यशस्वी पावलाचा गौरव करण्यासाठी गावकऱ्यांनी सुरज व त्यांचे वडील यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.



गावातील सरपंच भरत जाधव, मा.उपसरपंच बाळासाहेब कोहक सर, ग्रामपंचायत सदस्य महादेव कोहक, मा. उपसरपंच नंदूकुमार फसले,प्रदीप बांगर, योगेश डॉक्टर, यांच्यासह रामानंदपुरी महाराज,प्रा. नवनाथ जाधव सर, ताज खान, रवी कदम, बाळासाहेब कोहक आदी मान्यवर उपस्थित होते. सुरजने प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षण घेऊन गावाचे नाव उज्ज्वल केले. तो पुढे जाऊन एक यशस्वी डॉक्टर होईल आणि दौलावडगावचा मान वाढवेल, सुरजच्या जिद्दीचे कौतुक होत असून गरिबीतूनही मोठी स्वप्नं पूर्ण करणाऱ्या प्रत्येक तरुणासाठी तो प्रेरणास्थान आहे, सुरजच्या वडिलांनी गावकऱ्यांचे मनापासून आभार मानत, गावातील सर्वांच्या शुभेच्छा आणि आशीर्वादामुळेच हा दिवस पाहायला मिळाला, असे सांगितले. उपस्थितांनी सुरजवर शुभेच्छांचा वर्षाव करत उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.तर ही घटना दौलावडगावसाठी अभिमानास्पद ठरली असून, गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

---

## प्रसुती सिझेरियन असो की नॉर्मल : जननी सुरक्षा योजना आहे मदतीला



### कुठे आणि कसा मिळतो लाभ ?

लाभार्थ्याला सरकारी रुग्णालयात प्रसूती झाल्यानंतर हा निधी थेट बँक खात्यात दिला जातो.
यासाठी आशा कार्यकर्ती मदत करते. प्रसूतीनंतर आवश्यक कागदपत्रे जमा केल्यावर, थेट लाभ हस्तांतरण प्रणालीद्वारे (डीबीटी) रक्कम दिली जाते.

बीड । दिव्य न्युज

माता व बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने जननी सुरक्षा योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत, सरकारी रुग्णालयांमध्ये प्रसूती करणाऱ्या गरोदर महिलांना आर्थिक मदत दिली जाते. यामुळे संस्थात्मक प्रसूतीला प्रोत्साहन मिळत आहे, ज्यामुळे माता व नवजात बाळांचे आरोग्य सुरक्षित राखण्यास मदत होते.

### लाभासाठी निकष

दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाचा भाग असणे. सरकारी किंवा मान्यताप्राप्त खासगी रुग्णालयात प्रसूती.

### काय आहे जननी सुरक्षा योजना ?

गरोदर महिलांनी घरी प्रसूती करण्याऐवजी रुग्णालयात प्रसूती करावी यासाठी प्रोत्साहन देणे, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. सुरक्षित प्रसूती आणि त्यानंतरची काळजी यासाठी हा निधी वापरला जातो. ही योजना केंद्र सरकारच्या राष्ट्रीय आरोग्य अभियानाचा एक भाग आहे.

### कोणत्या महिलांना मिळतो लाभ ?

दारिद्र्यरेषेखालील (बीपीएल) कुटुंबातील गरोदर महिला, ज्यांची प्रसूती सरकारी रुग्णालयात किंवा जननी सुरक्षा योजनेसाठी नोंदणीकृत खासगी रुग्णालयात होते, त्या या योजनेसाठी पात्र आहेत. याशिवाय, २० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या गरोदर महिलांना त्यांच्या पहिल्या दोन प्रसूतींसाठी या योजनेचा लाभ मिळू शकतो.

### आवश्यक कागदपत्रे

आधार कार्ड, बँक पासबुकची प्रत, बीपीएल कार्डची प्रत, प्रसूती झाल्याचे प्रमाणपत्र, माता आणि बाल आरोग्य संरक्षण कार्ड आदी ९८ टक्के उद्दिष्ट पूर्ण या योजनेमुळे संस्थात्मक प्रसूतीचे प्रमाण वाढले आहे. आम्ही ही योजना शेवटच्या पात्र महिलेपर्यंत पोहोचवण्यासाठी तत्पर आहोत. आपले ९८ टक्के उद्दिष्ट पूर्ण झाले आहे.
डॉ. सचिन शेकडे, माता व बालसंगोपन अधिकारी, बीड.

### ७ हजार महिलांना मिळाला लाभ

गेल्या वर्षभरात जिल्ह्यातील ७७८६ महिलांनी जननी सुरक्षा योजनेचा लाभघेतला आहे. या आकडेवारीवरून ही योजना ग्रामीण आणि शहरी भागांत प्रभावीपणे राबवली जात असल्याचे दिसून येते.

# वडवणी येथील ईदगाह व कब्रस्तानच्या जागेवरील अतिक्रमण हटवणार-ना.समीर काझी







**बीड । दिव्य न्युज**

**बीड जिल्ह्यातील वडवणी येथील ईदगाह व कब्रस्तानची १४ एकर २२ गुंठे जमीन ही वक्फ बोर्डाच्या मालकीची असल्याचा निकाल छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील वक्फ ट्रिब्यूनलने दिलेला असून न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे सोमवार पासून हे अतिक्रमण हटविण्याबाबत कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे अभिवचन महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे कर्तव्यदक्ष व कार्यक्षम अध्यक्ष समीर काझी यांनी वडवणीच्या मुस्लिम बांधवांना दिले.**

दिव्य वार्ता

यាप्रसंगी माजी उपनगराध्यक्ष फारुक पटेल, एआयएमआयएमचे जिल्हाध्यक्ष एडवोकेट शेख शफीक भाऊ, खलील पठाण यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. दि.१९ सप्टेंबर रोजी शुक्रवारच्या नमाजनंतर दुपारी बीड जिल्ह्यातील वडवणी येथील मुस्लिम बांधवांनी महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांची त्यांच्या कार्यालयात जाऊन भेट घेतली आणि वडवणी येथील ईदगाह व कब्रस्तांच्या १४ एकर २२ गुंठे जमिनीवर झालेले अतिक्रमण वक्फ ट्रिब्यूनलच्या निर्णयाप्रमाणे हटविण्याची मागणी केली. याबाबत समीर काझी यांना दिलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे की, वडवणी येथील गट नंबर २१९ मध्ये १४ एकर २२ गुंठे जमिनीवर पुरातन काळापासून मुस्लिम समाजाचे ईदगाह व कब्रस्तान असून ही जमीन वक्फ बोर्डाच्या मालकीची आहे. परंतु या जमिनीवर अनेक लोकांनी अतिक्रमण केलेले आहे. त्याचप्रमाणे बेकायदेशीरपणे काही शासकीय कार्यालये देखील उभारण्यात आलेली आहेत. सदर जमिनीचा दावा छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील वक्फ ट्रिब्यूनल मध्ये सुरू होता. या दहाव्यामध्ये वक्फ ट्रिब्यूनलने जमीन वक्फ बोर्डाच्या मालकीची असल्याचा निकाल दिलेला आहे. वडवणी येथे मुस्लिम समाज मोठ्या प्रमाणात असून भविष्यातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता सदरील क्षेत्र कमी पडत आहे. आधीच या ठिकाणी मोठ्या प्रमाणात कबरी अस्तित्वात आहेत. त्यामुळे उर्वरित एक ते दीड एकर रिकाम्या क्षेत्रावर ईदगाह आहे. तेथे मुस्लिम बांधव ही जशी नमाज अदा करतात. ही एक ते दीड एकर जागा वगळता इतर सर्व जागेवर अतिक्रमण झालेले आहे. हे अतिक्रमण हटविल्यास मुस्लिम बांधवांना दफनविधीसाठी ही जागा वापरात येईल. त्यामुळे हे अतिक्रमण हटविण्यात यावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. याप्रसंगी माजी उपनगराध्यक्ष फारूक पटेल, एआयएमआयएमचे जिल्हाध्यक्ष एडवोकेट शेख शफीक भाऊ, खालील पठाण यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



जिंतूर येथील विलासराव देशमुख उर्दु शाळा व कॉलेज चे संस्था उपअध्यक्ष काजी वासेफोदीन सिद्दीकी यांना दिनांक २१ सप्टेंबर रोजी परभणी येथील बि रघुनाथ हॉल येथे एका कार्यक्रमात शिक्षक आमदार श्री विक्रम काळे यांच्या हस्ते शिक्षण क्षेत्रात उत्तकृष्ट कार्य केल्या बद्दल सन्मानचिन्ह व पुष्प गुच्छ देवून गौरविण्यात आले .

## राज्यातील ४३ टक्के सार्वजनिक उपक्रम तोट्यात

मुंबई । दिव्य न्युज

तोट्यातील महामंडळे बंद करण्याच्या सल्लयाकडे राज्य शासनाने वर्षानुवर्षे दुर्लक्ष केल्याने राज्यातील एकूण ११० पैकी तब्बल ४३ टक्के महामंडळे ही तोट्यात, तर नऊ टक्के महामंडळे 'ना नफा ना तोटा' अशा स्थितीत असल्याचे वास्तव आहे. विशेष म्हणजे तोट्यातील मंडळांना ५० हजार कोटींहून अधिकचा तोटा झाल्याने ही मंडळे सरकारसाठी 'पांढरा हत्ती' ठरली आहेत.

**"राज्यांच्या वित्त सचिवांची दोन दिवसांची परिषद पार पडली . त्यामध्ये महामंडळांच्या वार्षिक उलाढालींचा आढावा घेण्यात आला .**



**महामंडळांची स्थिती**

- ऊर्जा क्षेत्रातील चार कंपन्यांची वार्षिक उलाढाल ही १ लाख १२ हजार कोटी
- कार्यान्वित मंडळांपैकी ४३ टक्के तोट्यात तर ४१ टक्के फायद्यात, नऊ टक्के मंडळांना ना नफा ना तोटा
- सात टक्के मंडळांची वित्तीय आकडेवारीच उपलब्ध नाही, ११० पैकी ९१ मंडळे कार्यान्वित, १९ मंडळे बंद

**तोट्यातील महामंडळे**

महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, राज्य परिवहन महामंडळ (एसटी), महाराष्ट्र वस्त्रोद्योग मंडळ, महानिर्मिती कंपनी, मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे लिमिटेड.

**फायद्यातील महामंडळे**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई महानगर क्षेत्रविकास प्राधिकरण

देशातील सर्व राज्यांच्या वित्त सचिवांची दोन दिवसांची परिषद नुकतीच पार पडली. त्यात महाराष्ट्राच्या वित्त सचिव (वित्त व कोषागरे) डॉ. रिचा बागला यांनी राज्यातील वित्तीय सुधारणांबाबत सादरीकरण केले. २०२२-२३ या आर्थिक वर्षापर्यंत राज्यात विविध ११० सार्वजनिक उपक्रम किंवा मंडळे कार्यान्वित होती. त्यानंतर गेल्या

►► पान २ वर

## माजलगाव नगरपरिषद मध्ये अधिकारी व टेंडरधारकांनी मिळुन पाणीपुरवठा टेंडरात केला करोंडाचा भ्रष्टाचार -शेख रशिद

### कित्येक वर्षांपासून ठेवलेला जुना टेंडर रद्द करुन नविन टेंडर देण्याची मागणी

माजलगाव । दिव्य न्युज

माजलगाव नगरपरिषद हि भ्रष्टाचारांची माहेरघर झाले असुन पाणी पुरवठा टेंडर,स्वच्छता टेंडर, मालमत्ता कर टेंडर अश्या वेगवेगळ्या टेंडर प्रक्रिया मुळे भ्रष्टाचार वाढलेला आहे.अधिकारी , कर्मचारी व टेंडरधारक मिळुन करोंडो रुपयेंचा भ्रष्टाचार झालेला आहे हयाचाच भाग म्हणून ७ ते ८ वर्षांपासून पाणीपुरवठा टेंडर प्रत्येक महिन्याला ,वर्षाला टेंडर वाढिव करीत असुन हयात अधिकारी,कर्मचारी व टेंडरधारक मिळुन आर्थिक देवाणघेवाण करुन नगरपरिषदचा चुना लावायचे काम करत आहेत त्यामुळे माजलगाव नगरपरिषद मधील पाणीपुरवठा



टेंडर रद्द करुन नवीन टेंडर प्रक्रिया अवलंबून नविन टेंडर घेण्यात यावे नसता जिल्हाधिकारी कार्यालय समोर आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा सामाजिक कार्यकर्ता शेख रशिद यांनी मुख्याधिकारीला निवेदन दिले आहे.

नगरपरिषद मध्ये पाणीपुरवठा टेंडर ७,८ वर्षांपासून एका टेंडरधारकाला देण्यात

►► पान २ वर

## मोमीनपुरा भागात प्रशासनाने भेट देत स्वच्छता करुन दिल्या बद्दल आभार-जाफर इनामदार

### उर्वरित नाल्याची देखील स्वच्छता करून देणे गरजेचे



बीड । दिव्य न्युज

बीड शहरात मागील आठवडाभरापासून मुसळधार पाऊस कोसळत होता जेणे जनजीवन विस्कळित झाले होते मोठ्या प्रमाणात पावसाच्या पाण्याचा विसर्ग असल्याने नदी नाले ओसंडून वाजत होते जेणे करून मोमीन पुरा लेंडी नाल्याला देखील पुर सदृढ परिस्तिथी निर्माण झाली होती लेंडी नाल्याची पावसाळा पूर्व स्वच्छता न झाल्याने नाल्याचे पाणी नागरिकांच्या घरात शिरले होते जेणे करून लेंडी परिसरातील नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले नागरिकांचे संसारोपयोगी साहित्य उद्ध्वस्त झाले त्या नंतर त्या ठिकाणी तत्काळ जिल्हाधिकारी महोदय मुख्याधिकारी तहसीलदार यांनी भेटी दिल्या पंचनामे झाले

►► पान २ वर

## वडवणी तालुक्यातील उपळी गावातून गरीब कुटुंबाला मानसिक त्रास झाल्यामुळे दिला जल समाधी आंदोलन करण्याचा इशारा



वडवणी । दिव्य न्युज

वडवणी तालुक्यातील उपळी येथील रहिवासी कोंडीबा अनंतराव इचके यांनी होत असलेल्या त्रासाला कंटाळून जलसमाधी आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे.

त्यांचे असे म्हणणे आहे की माझ्या घरात मी व माझी पत्नी व चार मुली असा माझा परिवार असून गेल्या वर्षी माझ्या घर समोरील ग्रामपंचायत हद्दीमध्ये सिमेंटच्या रस्त्यावर अनधिकृत पत्र्याचे शेड मारून काही टवाळखोर पोरांनी अकरा दिवसा करिता गणपती बसविण्यात आला हा गणपती माझ्या दारासमोर बसविला होता व त्या टवाळखोर पोरांनी संपूर्ण आकारा दिवस दारू पिऊन येणे .मोठ्या आवाजात गाणे वाजवणे पत्ते (जुगार )धिंगाणा घालने, माझ्या घरातील मुलींना छेडछाड करणे असे प्रकार घडले आहे त्यामुळे मला मानसिक त्रास सहन करावा लागला परंतु देवाचया(आस्थेचे)विषय असल्यामुळे मी हा त्रास सहन केला .आकारा दिवस नंतर गणपती विसर्जन झाले त्या नंतर ही ते

►► पान २ वर

## वडवणीत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे आंदोलन संपन्न

वडवणी । दिव्य न्युज

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे संस्थापक तथा राज्य संघटक संजय भोकरे साहेब प्रदेशाध्यक्ष श्री गोविंद वाकडे सर प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे साहेब आणि प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी सर यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा,वडवणी तालुका, डिजिटल मीडिया,पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती वडवणी तालुका यांच्यावतीने आज दि. २२ सप्टेंबर वार सोमवार रोजी सकाळी १० वाजता नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथील पत्रकारावर गाव गुंडाकडून झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ तहसीलदार, वडवणी व




पोलीस उपनिरीक्षक वडवणी यांना लेखी निवेदन देण्यात आले व कठोर

►► पान २ वर

### संघर्षाची कहाणी : मोहंमद सिराज, भारतीय क्रिकेटर

## उधारीचे बूट घालून रिकाम्यापोटी सराव, आता यशस्वी गोलंदाज

**भारतीय वेगवान गोलंदाज मोहंमद सिराज (३१) हा आंतरराष्ट्रीय क्रिकेट मंचावर कठोर परिश्रम, आवड व धाडसाचे उदाहरण ठरला. गेल्या महिन्यात इंग्लंड कसोटीत त्याच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी आयसीसीने त्याला महिन्याचा सर्वोत्तम खेळाडू घोषित केले. हैदराबादच्या झोपडपट्टीतून टीम इंडियापर्यंतचा त्याचा प्रवास सोपा नव्हता. त्याबद्दल जाणून घेऊ.**

सिराजचा जन्म १३ मार्च १९९४ रोजी तेलंगणाची राजधानी हैदराबादच्या बंजारा हिल्स परिसरात झाला. त्याचे कुटुंब अतिशय सामान्य कुटुंबातून होते. त्याचे वडील मोहम्मद गौस उदरनिर्वाहासाठी ऑटोरिक्षा चालवत होते. त्याची आई कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी अनेक घरांमध्ये घरकामाचे काम करत होती. आर्थिक अडचणी गंभीर होत्या की सिराज लहानपणापासूनच कुटुंबाचे पालनपोषणासाठी केटरिंगमध्ये काम करत. रुमाली रोट्या बनवत असे. त्यात कधी कधी हात भाजत. एका मुलाखतीत सिराजने ते स्पष्ट केले.

**संघर्ष : प्रशिक्षणास २० किमी पायी, वडिलांच्या निधनाने कोसळला**

मोहंमद सिराजचे ट्रेनिंग ग्राउंड त्याच्या घरापासून २० किमी अंतरावर होते.



त्याच्या कुटुंबाकडे साधनसंपत्तीची कमतरता होती. सिराज अनेकदा मैदानावर चालत जायचा. त्याच्याकडे खेळण्यासाठी बूटही नव्हते. तो अनेकदा मित्रांकडून बूट उधार घेऊन खेळायचा. बसचे भाडे वाचवण्यासाठी सिराज जेवण सोडून रिकाम्या पोटी सरावासाठी निघून जायचा. २०२० मध्ये ऑस्ट्रेलिया दौऱ्याच्या अगदी आधी त्याच्या वडिलांचे निधन झाले. या दुःखात सिराजने त्याच्या वडिलांच्या कबरीला भेट दिली आणि त्याची स्वप्ने पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. सोशल मीडियावरील सुरुवातीची टीका आणि दुखापतींमुळेही सिराजचे नुकसान झाले. सोडून रिकाम्या पोटी सरावासाठी निघून जायचा. २०२० मध्ये ऑस्ट्रेलिया दौऱ्याच्या अगदी आधी त्याच्या वडिलांचे निधन झाले. या दुःखात सिराजने त्याच्या वडिलांच्या कबरीला भेट दिली आणि त्याची स्वप्ने पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. सोशल मीडियावरील सुरुवातीची टीका आणि दुखापतींमुळेही सिराजचे नुकसान झाले. या परिस्थितीमुळे सिराजने क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याचा विचारही केला.

**सुरुवात: वयाच्या २१ व्या वर्षी रणजी ट्रॉफी, आयपीएलमध्ये**

सिराजने २०१५ मध्ये हैदराबादच्या रणजी ट्रॉफी संघातून पदार्पण केले. तेथे त्याने पहिल्या हंगामात ४१ विकेट घेत सर्वांचे लक्ष वेधले. सनरायझर्स हैदराबादने त्याला २०१७ च्या आयपीएल संघात समाविष्ट केले. त्याची मेहनत फळाला आली. न्यूझीलंडविरुद्ध टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले.

**यश: आयपीएलमध्ये १२.२५ कोटींत विक्री, ग्रेड ए करारही**

२०२४ मध्ये तेलंगणा सरकारने सिराजची डीएसपी म्हणून नियुक्ती केली. बीसीसीआयने २०२४-२५ च्या केंद्रीय करारात सिराजला ग्रेड ए खेळाडूंमध्ये समाविष्ट केले. त्या अंतर्गत त्याला वार्षिक रिटेनर फी ५ कोटी मिळते. २०२५ मधधील आयपीएल लिलावात, सिराजला गुजरात टायटन्सने १२.२५ कोटींना खरेदी केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०